महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद-४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल : roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०२०/ २९० दिनांक : 29 JAN 2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदविका/पदवी संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता एनएसपी पोर्टलवर तंत्राशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या एआयसीटीई योजनांच्या (प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजना) अंमलबजावणीबाबत......**

संदर्भ : मा.संचालक,तंत्रशिक्षणसंचालनालय,महाराष्ट्रराज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२१/२७, दिनांक २७.०१.२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद मान्यता प्राप्त व तंत्रिक अभ्यासक्रमांचे (पदवी आणि पदविका ) शिक्षण देणा-या सर्व संस्थांमधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये National Scholarship Portal व्दारे राबविण्यात येणा-या **'प्रगती'** (विद्यार्थीनींसाठी) व **'सक्षम'** (विशेष सक्षम विद्यार्थ्यांसाठी) या शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्यासाठी दि. ३१.०१.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तसेच संस्थांनी त्यांच्या लॉगीन मधुन योजनेअंतर्गत प्राप्त होत असलेले विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करीता (मंजूर/नामंजूर) दि.१०.०२.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

उपरोक्त बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी. सदर योजनेस अर्ज केलेला कोणताही विद्यार्थ्यी /विद्यार्थ्यीनी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. जर अंतिम मुदती नंतर योजनेचे कोणतेही अर्ज तपासणीसाठी (मंजूर/नामंजूर) प्रलंबीत राहिले अथवा कोणताही पात्र विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील, याची नोंद घ्यावी.

सोबत : संदर्भीय पत्राची प्रत.

**(महेश शिवणकर)**
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.

F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिकामार्ग, पत्रपेटीक्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६

ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.inवेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ - स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२१/२७.

दिनांक : २७ /०१/२०२१

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता एनएसपी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या एआयसीटीई योजनांच्या अंमलबजावणीबाबत.... ( मुदतवाढ )**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२०/३३० दि.१४/१०/२०२०
२. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/ईबीसी/व्ही.सी./२०२०/३४२ दि.२६ /१०/२०२०
३. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/एनएसपी/व्ही.सी./२०२०/३४७ दि.०२ /११/२०२०
४. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२०/२१ दि.१९/०१/२०२१

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या National Scholarships Portal (NSP) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ-www.scholarships.gov.in )राबविण्यात येणाऱ्या **प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती** योजनांच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीबाबत या कार्यालयाकडून संदर्भीय १ व ४ च्या पत्राद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच याबाबत संदर्भ क्र.२ व ३ च्या पत्रान्वये घेतलेल्या व्हीडीओ कॉन्फरन्स बैठकीद्वारेदेखील याबाबत सर्व संबंधित संस्थांना आवश्यक मार्गदर्शन व सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व तांत्रिक अभ्यासक्रमांचे ( पदविका व पदवी ) शिक्षण देणाऱ्या सर्व संस्थांना, सन २०२०-२१ साठी, संस्थांनी त्यांच्या संस्थेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal द्वारे राबविल्या जाणाऱ्या उपरोक्त योजनांकरिता एनएसपी पोर्टलवर अर्ज भरण्यासाठी **दि.३१-०१-२०२१ पर्यंत** तसेच संस्थांना त्यांच्या लॉगीनमध्ये योजनेतंर्गत प्राप्त होत असलेले विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीकरिता ( मंजूर / नामंजूर ) **दि.१०-०२-२०२१ पर्यंत** मुदतवाढ दिली असल्याबाबत सर्व विद्यार्थ्यांना संस्थांमार्फत सूचित करावे. सोबत एनएसपी पोर्टलवरील उपरोक्त योजनेच्या मुदतवाढीबाबतचे स्क्रीनशॉटस जोडले आहेत. तसेच योजनेच्या लाभासाठी अर्जांची संख्या वाढण्याच्या दृष्टीने अर्ज भरुन घेण्याबाबत आवश्यकता वाटल्यास सर्व संस्थासोबत व्ही.सी. द्वारे बैठक घेऊन सूचना द्यावी.

तसेच सर्व संस्थांनी उपरोक्त योजनेचे त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज, योजनेच्या अटी व शर्तीनुसार प्रलंबित न ठेवता वेळोवेळी पोर्टलद्वारे दर्शविल्या जाणाऱ्या अंतिम मुदतीपूर्वी संस्था स्तरांवर तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन निकाली काढण्याबाबत सर्व संबंधित संस्थांना सूचित करावे. जर अंतिम मुदतीनंतर योजनेचे कोणतेही अर्ज तपासणीसाठी ( मंजूर / नामंजूर ) प्रलंबित राहिले अथवा कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई

प्रत - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई. ( लक्षवेध -श्री. संजय धारुरकर, अवर सचिव ) यांना माहितीसाठी सविनय सादर.